**स्वामित्व योजने अंतर्गत मालकी हक्क पत्रक ऑनलाईन पध्दतीने मिळविणेबाबत.**

**जिल्हा परिषद, नागपूर**
**(ग्रामपंचायत विभाग)**

**परिपत्रक क्रमांकः जिपना /पंचा/स्था-६/१८३०/ २०२२ दिनांक : ९ मे २०२२**

नविन ईमारत, रविभवन समोर, सिव्हील लाईन, नागपुर ४४०००१
☎ ०७१२-२५६४२०३ Email Address :-
dyceopanchayatnagpur@gmail.com

## परिपत्रक

**वाचाः-** महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई -३२ शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण -२०१८/प्र.क्र.१३/ मातंक दिनांक :२५ फेब्रुवारी २०१९

**प्रस्तावनाः**

नागपूर जिल्हयात स्वामित्व योजना ( राज्यातील गावठाण जामबंदी प्रकल्प) राबविण्याचे दृष्टीने भारतीय सर्वेक्षण विभाग , जमाबंदी आयुक्त कार्यालय पुणे व ग्रामविकास विभाग यांचे माध्यमातुन कार्यवाही करण्यात येत आहे. नागपूर जिल्हयामधील सर्व गावाचे गावठाणामधिल मिळकतीचे सर्वेक्षण ड्रोनव्दारे करण्यात आले आहे.

**परिपत्रकः**

उपरोक्त पार्श्वभूमीच्या आधारे क्षेत्रीय स्तरावर सत्वर कारवाई करून ड्रोन व्दारे गावठाणाचे सर्वेक्षण करून, गावाचे नकाशे प्राप्त करून ग्रामपंचायत गाव नमुना ८ नुसार नकाशावर घर क्रमांक देणे अनुक्रमांक देणे, कच्चे फिल्ड बुक तयार करणे, ईत्यादी सर्व प्रकारचे कामे पुर्ण करून नकाशे संबधित माहिती ग्रामपंचायत व तलाठी चावडीवर प्रसिध्द करण्यात आली आहे. नकाशावर जागेवरील आढळुन आलेल्या तृटयांची दुरूस्ती करून सुधारीत नकाशा व अनुषांगीक माहिती अंतिम करण्यात आली आहे. त्यानंतर मिळकत धारकांना मिळकत पत्रिका /सनदेचे वाटप करण्याचे काम आता कार्यवाहीत आहे.

ज्या गावांमध्ये मिळकत प्रत्रिका शासनाच्या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत, त्या नागरीकांना डाऊनलोड करता याव्यात यासाठी खालील प्रमाणे आवश्यक टप्पे आहेत.

**<u>मालकी हक्क पत्र बघण्याकरिता / डाउनलोड करण्याकरीता खालील प्रमाणे टप्पे वापरावेत</u>**

mahabhumi.gov.in या वेबसाईटवर व्हीजीट करावे.

(हे पोर्टल भूमी अभिलेख सेवासाठींचे पोर्टल आहे)

⇩

फेरफार व मालमत्ता पत्रक हा पर्याय निवडावा.

⇩

OTP व्दारे Login हा पर्याय निवडावा.

⇩

एन्टर मोबाईल नंबर (मोबाईल नंबर टाकावा)

⇩

Send OTP बटनवर क्लीक करावे

⇩

↓

Verify OTP वर क्लिक करावे.

↓

विभाग - निवडावा ( नागपूर विभाग)

↓

जिल्हा - निवडावा (नागपूर जिल्हा)

↓

तालुक/कार्यालय निवडावे.

↓

गाव- निवडावा.

↓

भूमापन क्रमांक निवडावा.

↓

View only/डाऊनलोडवर क्लीक करावे.

**(जर एखादया व्यक्तीला भूमापन क्रमांक माहिती नसल्यास, त्या व्यक्तीला संबंधित तालुक्यातील उपअधिक्षक, भूमीअभिलेख या कार्यालयासी संपर्क करून स्वतःचा भूमापन क्रमांक माहिती करून घेता येईल. )**

अशा प्रकारे संबंधितास आपला मालकी हक्कपत्र ऑनलाईन बघता येऊ शकतो. जर हा मालकी हक्क पत्र डाउनलोड करावयाचा असल्यास अल्पदराने ऑनलाईन शुल्काचा भरणा करून वैयक्तीक मोबाईल वर डाउनलोड करता येईल/येऊ शकते.

**शुल्कः- मिळकत पत्रिका रू.४५/- (प्रति मिळकत पत्रिका)**

उपरोक्त विषायाचे अनुषंगाने सदर परिपत्रकाची व्यापक प्रसार प्रसिध्दी जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामंपचायत स्तरावरून करण्यात यावी.

06/05/

(योगेश कुंभेजकर,भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नागपूर**

प्रत,

१.जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांना माहितीस अग्रेषित.
२.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)जिल्हा परिषद नागपूर यांना माहितीस अग्रेषित.
३. गट विकास अधिकारी पंचायत समिती ---------(सर्व) यांना माहिती तथा प्रचार प्रसिध्दी करण्यास्तव अग्रेषीत.
४.सरपंच/सचिव ग्राम पंचायत ---------------(सर्व) मार्फत गट विकास अधिकारी पंचायत समिती ---------- यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीस अग्रेषित.

r